# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

"मुंबै बँक भवन",२०७, डॉ.डी.एन.रोड,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

****************

## // जाहीर निवेदन //

**बँकेचे सर्व सभासद , ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांना,**
**स.न.वि.वि.**

बँकेने ग्राहकांच्या सोयीस्तव सन२००७ पासून सीबीएस प्रणाली अवलंबली आहे. सदर प्रणालीमध्ये ब-याच त्रुटी होत्या. अनेक शाखांमध्ये वारंवार खंडीत कनेक्टिव्हिटीमुळे शाखांच्या पर्यायाने बँकेच्या आर्थिक व्यवहारावर परिणाम होत होता. त्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. त्याशिवाय बँकेच्या व्यवहाराशी निगडीत अनेक रिपोर्टसही मिळत नव्हते. बँकेने सध्याच्या प्रणालीमधील शाखास्तरावरील असलेल्या सर्व अडचणीचे निराकरण करुन नविन सॉफ्टवेअर विकसित केलेले आहे. सध्याच्या सीबीएसचा संपूर्ण डेटा नविन कोअर बँकिंग प्रणालीमध्ये (CBS) शनिवार, दि.२३/०४/२०२२ ते रविवार दि.२४/०४/२०२२ या सुट्टीचे कालावधीमध्ये स्थलांतरीत (Migration) करणेत येणार आहे.

सिस्टीम अपग्रेडमुळे होणारा ग्राहकांच्या दृष्टीने एक मोठा बदल म्हणजे ग्राहकांचे जुने खाते क्रमांक १४ अंकी ऐवजी १५ अंकी मध्ये बदलण्यात येत आहे. तसेच, ग्राहकांना देण्यात येणारे बँक स्टेटमेंट नवीन स्वरुपात असेल.

दि.२२/०४/२०२२ रोजी रात्री १२.०० वाजल्या पासून ते दि.२५/०४/२०२२ अखेर सकाळी ११.०० वाजेपर्यंत रुपे व रुपे कार्डमार्फत पुरविल्या जाणा-या एटीएम, पॉस व E-Com तसेच, दैनंदिन ठेव योजना, Clearing RTGS/NEFT या सुविधा बंद रहाणार आहे.

सोमवार दिनांक २५/०४/२०२२ रोजी बँकेची नविन सीबीएस प्रणाली कार्यान्वित होणार आहे. **दि.१८/०४/२०२२ ते दि.२२/०४/२०२२ रोजी शाखेमध्ये सेविंग्ज ठेव व दैनंदिन ठेव योजना, कर्ज खाते नवीन उघडणे तसेच चेकबुक विनंती, ठेव खाते इ. सेवा बंद राहणार आहेत.** तसेच दि.२५/०४/२०२२ व दि.२६/०४/२०२२ रोजी शाखेमध्ये पासबुक प्रिंटींग खाते उतारा सेवा बंद राहणार आहेत. नविन सीबीएस प्रणाली सुरु करत असताना काही तांत्रिक कारणास्तव इतर शाखा कामकाजात व्यत्यय आलेस बँकेस सहकार्य करावे हि विनंती. तसेच नविन सीबीएस प्रणाली कार्यान्वीत झालेनंतर ग्राहकांना चांगली सुविधा मिळेल याची आम्हास खात्री आहे Migration कालावधीमध्ये होणारे तसदीबद्दल क्षमस्व.

**कार्यकारी संचालक**

Z:\Vaishu\vb19080.doc